जा.क्र./वपोनि/सनगार/पर्सनल/( ७३२५ )/२०१८ पुणे दिनांक १/११/२०१८

विषय :- चांगली कामगिरी (Good Work)

संदर्भ :- सहकारनगर पोलीस ठाणे गु.र.नं. १२७/१९९८ भा.द.वि.कलम ४०९

(आर.सी.सी.नं. २८१/१९९९ )

---

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये सादर की, सहकारनगर पोलीस ठाणे गु.र.नं. १२७/१९९८ भा.द.वि.कलम ४०९ मधिल आरोपी पदमाकर शंकर देखणे रा. ३२७, नारायण पेठ, पुणे हे दि. १/०४/१९९१ ते १५/०३/१९९३ या कालावधीत धनकवडी येथे ग्रामविकास अधिकारी म्हणुन कार्यरत असताना त्यांनी चुकीच्या नोंदी करुन शासनाची तब्बल ९२ लाख १५ हजार रुपयांची फसवणुक केल्याची तक्रार देण्यात आली होती. त्यामुळे त्यांच्या कार्यकालात झालेल्या नोंदीचे १९९५ ते १९९६ दरम्यान ऑडीट करण्यात आले. त्यात चुकीच्या नोंदी केल्याचे उघड झाले होते. त्यावरुन फिर्यादी नामदेव गंगाधर लोहकरे रा.हिंगणे खुर्द, विठठलवाडी, पुणे यांनी फिर्याद दिल्याने वरिलप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक आबाजी अहिवळे यांनी करुन दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले होते.

सदर गुन्हयात सरकारी पक्षातर्फे ॲड. भानुप्रिया पेटकर यांनी बाजु मांडली. सदर गुन्हयात आरोपी पदमाकर शंकर देखणे हे दोषी आढळल्याने मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, ए.एस.पानसरे, न्यायालय क्र. ४, पुणे यांनी दि. २६/१०/२०१८ रोजी ३ वर्षे सक्तमजुरी आणि ५ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास १ महिना साधा कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.